**AC – 20/05/2025**

**Item No.- 5.45 (N) Sem-III 2(c)**

# As Per NEP 2020

## University of Mumbai

| | |
|---|---|
| **Syllabus for<br>Basket of Marathi - AEC** | |
| **Board of Studies in Marathi** | |
| **Second Year Programme** | |
| **Semester** | **III** |
| **Title of Paper** | **Credits** |
| **भाषिक कौशल्यांचे उपयोजन - २<br>(कथाकथन कौशल्य आणि अभिवाचन कौशल्य)** | **2** |
| **From the Academic Year** | **2025-26** |

# Syllabus
# B.A. (Marathi AEC)
# (Semester - III)

**Title of Paper : भाषिक कौशल्यांचे उपयोजन - २ (कथाकथन कौशल्य आणि अभिवाचन कौशल्य)**

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **अभ्यासक्रमाचे वर्णन** (**Description of the Course**) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर (Wholistic Development) भर देते. सर्वांगीण विकासाचा भाग म्हणून **क्षमता वर्धन अभ्यासक्रम (Ability Enhancement Course)** या स्तंभांतर्गत भाषिक कौशल्यांशी संबंधित अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना तिसऱ्या सत्रामध्ये 'आधुनिक भारतीय भाषां'चे अध्ययन अनिवार्य करण्यात आले आहे. सदर **क्षमता वर्धन अभ्यासक्रमाचे** स्वरूप प्रामुख्याने भाषाकेंद्री असावे, असेही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या भाषिक कौशल्यांचा तपशीलवार परिचय करून देणे, तसेच ती कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे, ही या अभ्यासक्रमाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत.<br>विद्यार्थ्यांमध्ये पदवीचे शिक्षण घेत असताना भाषिक कौशल्ये विकसित व्हावीत, भाषिक कौशल्यांच्या आधारे त्यांना संबंधित क्षेत्रांत काम करण्याची संधी प्राप्त व्हावी, हे लक्षात घेऊन **'भाषिक कौशल्यांचे उपयोजन-२ (कथाकथन कौशल्य आणि अभिवाचन कौशल्य)'(श्रेयांकने २)** या अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली आहे. या अभ्यासपत्रिकेच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना कथाकथन व अभिवाचन कौशल्यांचे तात्त्विक स्वरूप कळेल, तसेच कथाकथन व अभिवाचनासाठी आवश्यक कौशल्यांचा परिचय होऊन, ती कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध होईल. |
| 2 | **Vertical :** | Ability Enhancement Course |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit**: | 2 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 30 Hours<br>(AEC या स्तंभांतर्गत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासपत्रिकांच्या कार्यभारासंबंधी मुंबई विद्यापीठाच्या दिनांक २३ जुलै २०२४ च्या NO.AAMS_UGS/ICC/2024-25/19 या परिपत्रकाचा आधार घ्यावा.) |
| 6 | **Marks Allotted**: | 50 Marks |

| | |
|---|---|
| 7 | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. कथाकथन या भाषिक कौशल्याचे स्वरूप समजावून सांगणे.<br>२. प्रभावी कथाकथन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि तंत्रांचा परिचय करून देणे.<br>३. अभिवाचन या भाषिक कौशल्याचे स्वरूप समजावून सांगणे.<br>४. प्रभावी अभिवाचन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि तंत्रांचा परिचय करून देणे.<br>५. प्रत्यक्ष कथाकथन व अभिवाचन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि कौशल्ये विकसित करणे. |
| 8 | **अभ्यासक्रम निष्पत्ती** (**Course Outcomes**) **:**<br>१. विद्यार्थ्यांना कथाकथन या भाषिक कौशल्याचे स्वरूप समजेल.<br>२. विद्यार्थ्यांना प्रभावी कथाकथनासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि तंत्रांचा परिचय होईल.<br>३. विद्यार्थ्यांना अभिवाचन या भाषिक कौशल्याचे स्वरूप समजेल.<br>४. विद्यार्थ्यांना प्रभावी अभिवाचन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि तंत्रांचा परिचय होईल.<br>५. विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कथाकथन व अभिवाचन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि कौशल्ये विकसित होतील. |
| 9 | **अभ्यासक्रम घटक** (**Modules**) **:** |
| | **घटक - १ : कथाकथन कौशल्य** |
| | **अ) कथाकथन : तात्त्विक परिचय**<br>● गोष्ट, कथा, कथाकाव्य यांमधील वैविध्य व त्यांचे कथन<br>● कथाकथनामधील मुख्य घटक : १. गोष्ट / कथावस्तू २. कथाकथनकार ३. गोष्ट / कथावस्तूचे प्रत्यक्ष कथन ४. लक्ष्य श्रोता / रसिक<br>● कथाकथनाचे विशेष : १. कथाकथन : एक सांस्कृतिक उपक्रम २. कथाकथन : आनंद व मनोरंजनाचे साधन ३. कथाकथन : आशय संप्रेषणाचे प्रभावी माध्यम<br>● कथाकथनाचे प्रकार : १. पारंपरिक कथाकथन २. साभिनय कथाकथन ३. सामाजिक प्रसारमाध्यमांसाठी कथाकथन<br><br>**आ) कथाकथनाची पूर्वतयारी व आवश्यक कौशल्ये,**<br>● लक्ष्य श्रोता / रसिकाविषयीची समज (कथाकथन कोणासाठी?), कथावस्तूची निवड व सराव<br>● कथाकथनासाठी आवश्यक भाषिक कौशल्ये : १. भाषिक समज २. बोली व प्रमाणभाषेतील स्पष्ट उच्चारण ३. कथनातील लय व गती<br>● कथाकथनासाठी आवश्यक संवाद कौशल्ये : १. आवाज २. घटना-प्रसंगातील नाट्याची समज ३. कथनातील थांबे (Pauses)<br>● कथाकथनाची शैली व शैलीची लवचीकता<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १)<br><br>(सूचना : शिक्षकांनी कथासंहिता निवडून त्याआधारे विद्यार्थ्यांकडून कथाकथनाचा सराव करून घ्यावा.) |

| | |
|---|---|
| | **घटक - २ :  अभिवाचन कौशल्य** |
| | **अ) अभिवाचन : तात्त्विक परिचय**<br>● वाचन, अभिवाचन यांमधील साम्य-भेद<br>● अभिवाचनामधील मुख्य घटक : १. संहिता २. अभिवाचक ३. संहितेचे प्रत्यक्ष अभिवाचन ४. लक्ष्य श्रोता / रसिक<br>● अभिवाचनाचे विशेष : १. अभिवाचन :  एक सांस्कृतिक उपक्रम २. अभिवाचन : आनंद व मनोरंजनाचे साधन ३. अभिवाचन :  आशय संप्रेषणाचे प्रभावी माध्यम<br>● अभिवाचनाचे प्रकार : १. पारंपरिक अभिवाचन (लोककथा, धार्मिक ग्रंथ) २. संहितांचे अभिवाचन (काव्य, कथा, कादंबरी, नाट्य व अन्य ललित, ललितेतर संहिता) ३. सामाजिक प्रसारमाध्यमांसाठी अभिवाचन<br>**आ)  अभिवाचनाची पूर्वतयारी व आवश्यक कौशल्ये**<br>● लक्ष्य श्रोता / रसिकाविषयीची समज ( अभिवाचन कोणासाठी?), अभिवाचन संहितेची निवड व सराव<br>● अभिवाचनासाठी आवश्यक भाषिक कौशल्ये : १. भाषिक समज  २. बोली व प्रमाणभाषेतील स्पष्ट उच्चारण ३. अभिवाचनातील लय व गती<br>● अभिवाचनासाठी आवश्यक संवाद कौशल्ये  : १. आवाज  २. घटना-प्रसंगातील नाट्याची समज ३. अभिवाचनातील थांबे (Pauses)  ४. सहअभिवाचकांशी समन्वय<br>● अभिवाचनाची शैली व शैलीची लवचीकता<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १)<br><br>(सूचना : शिक्षकांनी विविध प्रकारचे उतारे निवडून त्याआधारे विद्यार्थ्यांकडून अभिवाचनाचा सराव करून घ्यावा.) |
| 10 | **पाठ्य ग्रंथ (Text Books) : N.A.** |
| 11 | **संदर्भ ग्रंथ (Reference Books) :**<br>१. *कथा आणि कथाकथन*, राजा मंगळवेढेकर, मंजुल प्रकाशन, पुणे, १९७२.<br>२. *मराठी भाषिक कौशल्य विकास*,  (संपा०) पृथ्वीराज तौर, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१८.<br>३. *व्यावहारिक मराठी*, ल० रा० नसिराबादकर, भाषा विकास संशोधन संस्था, कोल्हापूर,२०२३.<br>४. *व्यावहारिक मराठी*, (संपा०) स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती - २०११.<br>५. *उपयोजित मराठी*, (संपा०) केतकी मोडक आणि इतर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१२.<br>६. *व्यावहारिक मराठी*, प्रकाश परब, मिथुन प्रकाशन, डोंबिवली, १९८९.<br>७. *वाचिक अभिनय,*  श्रीराम लागू, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९८.<br>८. *आवाज साधना शास्त्र*, बी० आर० देवधर, रागबोध प्रकाशन, पुणे, १९६५. |

| | | |
|---|---|---|
| 12 | **Internal Continuous Assessment : 40%** | **External, Semester End Examination : 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |

| | |
|---|---|
| **13** | **अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन (Internal Continuous Assessment) :** २० **गुण**<br>**अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप (Format of Internal Assessment) :**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / नियतकार्य (Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा यांपैकी कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल. (प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन) |
| **14** | **बहिर्गत परीक्षा (External Examination) : ३० गुण (वेळ : एक तास)**<br>**बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप (Format of Question Paper) :**<br>१. प्रत्येकी **१५** गुणांचे एकूण **तीन** प्रश्न विचारावेत. त्यांपैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवावेत.<br>२. पहिले **दोन** प्रश्न दीर्घोत्तरी स्वरूपाचे असावेत. दोन्ही घटकांवर आधारित **१५** गुणांचे अंतर्गत पर्याय असलेले **दोन** प्रश्न विचारावेत.<br>३. **तिसरा** प्रश्न हा घटक क्रमांक एक व दोनवर आधारित **१५** गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. प्रत्येक घटकावर दहा याप्रमाणे एकूण **वीस** वस्तुनिष्ठ प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी कोणतेही **पंधरा** प्रश्न सोडवावेत. |

| Sd /- | Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|---|
| **Sign of the BOS Chairman**<br>**Prof. Dr. Satish Kamat**<br>**Board of Studies in Marathi** | **Sign of the Offg. Associate Dean**<br>**Dr. Suchitra Naik**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the Offg. Associate Dean**<br>**Prof. Manisha Karne**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the Offg. Dean**<br>**Prof. Anil Singh**<br>**Faculty of Humanities** |